CNR NO. MHBI050007242024

## नियमित दिवाणी दावा क्र. ४०५/२०२४ मधील नि. ४३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज मयत वादी क्र. ४ शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख यांच्या वारसांतर्फे वादी क्र. ४ यांच्या मृत्युपश्चात वादीचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जात असे नमुद करण्यात आले आहे की, वादी क्र. ४ शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख हे दावा न्यायप्रविष्ठ असतांना दिनांक ११/१२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत, परंतु वादी यांचा मृत्यूनंतर अर्जदार हे दुखात असल्याने बाहेरगावी राहत असल्याने व वैयक्तीक अडचणींमुळे मयत वादीचे वारसांना अभिलेखावर घेणेस १ वर्ष ३ महिन्याचा विलंब झालेला आहे, सदरचा विलंब हा जाणुनबुजून नसून केवळ वर नमूद कारणामुळे झालेला आहे तरी सदरचा विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती अर्जदारांतर्फे करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचेतर्फे म्हणणे दाखल करुन असे नमुद करण्यात आले की, अर्जात नमुद कारण हे संयुक्तीक व आधारभुत नसलेली आहेत, मुदत कायदा कलम ५ प्रमाणे कुठलेही पुरेसे कारण नाही त्यामुळे अर्ज रक्कम रु. १०,०००/– खर्च आकरून मंजुर करावा.

०३. अर्जदारांतर्फे विदवान ***विधिज्ञ एस.एस. व्यवहारे*** यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादीतर्फे विदवान ***विधिज्ञ पी.पी. दहिवाळ*** यांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुतचा दावा हा घोषणा, चिरकाल मनाई हुकुमाची डिक्री मिळणेबाबत दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील वाद विचारात घेता मयत वादीचे कायदेशीर प्रतिनिधी यांना दावा पुढे चालविणेचा हक्क अबाधित राहतो. तेव्हा अशा परिस्थितीत दाव्यात योग्यप्रकारे, परिणामकारक निर्णय होण्याकरीता नानाविविध प्रकरणे होण्याची शक्यता टाळण्याकरीता मयत वादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. वादीतर्फे प्रामुख्याने प्रस्तुत वादी मयत झाल्यानंतर अर्जदार हे दुखात असल्यामुळे व बाहेरगावी असल्याने प्रस्तुत दाव्यात अभिलेखावर मुदतीत येता आलेले नाही व त्याकरीता १ वर्ष ३ महिन्याचा विलंब झालेला आहे असे शपथेवर नमुद करण्यात आलेले आहे. परंतु झालेला एवढा दिर्घ विलंब विचारात घेता अर्जात नमुद केलेले कारण समर्पक व समर्थनीय नाही. प्रतिवादीतर्फे देखील त्याच कारणावरुन अर्जास विरोध दर्शविण्यात आलेला आहे, परंतु याठिकाणी नमुद करण्यात येते की, दाव्याचे स्वरुप विचारात घेता दावा मिळकतीत हक्क असणा–या सर्व व्यक्तीना त्याची बाजू मांडणेची संधी मिळणे आवश्यक आहे. केवळ विलंबाचे समर्पक व समर्थनीय कारण अर्जात नमूद नाही या एकमेव कारणावरुन अर्ज नाकारणे उचित नाही. दावा अद्याप प्राथमीक स्थितीत आहे. प्रस्तुत विलंबाचा अर्ज मंजूर केल्यास व मयत वादीच्या वारसांना दाव्यात समाविष्ट होण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादीवर कसलाही अन्याय होणार नाही. एकंदरीत वादी व प्रतिवादीमधील वादाचे स्वरुप, दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याची बाब, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम १ व ३ अन्वये वादी क्र. ४ शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीना दावा पुढे चालविणेचा हक्क अबाधित राहत असल्याची बाब विचारात घेता प्रस्तुत प्रकरणात मयत वादी क्र.४ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणे न्याययोग्य दिसून येते. दाव्याचे स्वरुप विचारात घेता अशाप्रकारचे प्रस्तुत अर्ज उदारतेने विचारात घेवून झालेला विलंब उदारतेने माफ करणे आवश्यक आहे,

फारफारतर झालेल्या विलंबाबाबत अर्जदारांवर खर्च लावून अर्ज मंजूर करणे न्याययोग्य असेल, जेणेकरुन कोणावरही अन्याय होणार नाही व मुख्य पक्षकारांमधील वाद गुणदोषावर निर्णयीत होण्याचा हेतू साध्य होईल. सबब प्रस्तुत प्रकरणात न्यायहेतूने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) निशाणी क्र. ४३ वरील अर्ज रक्कम रु.५००/- (पाचशे रुपये) खर्चावर मंजूर करणेत येतो. अर्जदारांनी/वादींनी खर्च रक्कम पुढील तारखेस किंवा तत्पूर्वी प्रतिवादी यांना दयावी.

२) खर्च रक्कम जमा केल्यानंतर किंवा दिल्यानंतर मयत वादी शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्याचे कामी समाविष्ट होण्यास झालेला विलंब माफ समजण्यात येईल व यदाकदाचीत पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द समजण्यात येईल.

"दावा येणेप्रमाणे पुढे चालेल."

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.08.06 11:15:14 +0530

(एम.बी.सोनटक्के),
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

दिनांक -०६/०८/२०२५

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 06/08/2025.
Transcribed on : 06/08/2025.
Signed on : 06/08/2025.

Digitally signed by AKASH BASAVRAJ KABNE
Date: 2025.08.06 11:17:01 +0530

Date:06/08/2025.
Place: Ambajogai.

(Akash Kabne)
Stenographer Grade-III
Jt. Civil Court (S.D.), Ambajogai.